# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००३५४२

**अपिलार्थी श्री. परवेज अन्सारी**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रेणी-१ (पी/उत्तर)**
सहकार विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१

**प्रथम अपिलीय अधिकारी**
सहकार विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१

### व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०४.०३.२०२६

अपीलकर्ता : अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १८.०२.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.)
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०४.०९.२०२४ | ०९.१०.२०२४ | १६.१०.२०२४ | ३०.०५.२०२५ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २५.११.२०२४ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केलेले नाहीत असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलार्थी यांनी दि. ०४.०९.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर एसआयए को.ऑप.हौ. सोसायटी विषयी पुढील माहितीची मागणी केली होती:-

*(1) Certified / Xerox Copies of all Allotment letter of tenants of Dr. Babasaheb Ambedkar SRA Co-operative Housing Society Ltd allotted in Shree Ganraj SRA Co-operative Society Ltd which is issued by Authorized & Co-operative Officer of P/North of S.R.A. since 2021 to till date.*

*(2) Certified / Xerox Copies of all relevance documents of tenant submitted before this authority for obtaining Allotment Letter.*

*(3) Certified / Xerox Copies of bio-metric details of tenant of Dr. Babasaheb Ambedkar SRA Co-operative Housing Society Ltd for obtaining above said Allotment Letter.*

*(4) Certified / Xerox Copies of PAP details alongwith all relevance documents submitted before this authority for occupation in Shree Ganraj SRA Co-operative Society Ltd.*

जन माहिती अधिकारी यांनी उत्तर न दिल्याने अपिलार्थींनी दि. १६.१०.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले.

..२/-

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी सुनावणी नोटीस प्राप्त असूनही अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. ०२.०३.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, त्यांनी अपिलार्थींना माहिती अर्जाच्या अनुषंगाने मुद्दा क्र. (१) व (२) बाबत कळविले की, वाटपपत्र हे संबंधित पात्र झापेडीधारकास देण्यात येत असुन त्याची दुय्यम प्रत या कार्यालयात ठेवण्यात येत नाही. त्यास्तव सदरची माहिती आपणास पुरविता येत नाही. परंतु, श्री. गणराज एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित., या संस्थेची सदनिका वाटप यादी या कार्यालयात उपलब्ध असुन आपण या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहुन आपणास आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन प्रती पृष्ठे २/- याप्रमाणे चलन लेखा शाखेत दुपारी ३ ते ५ या वेळेत भरुन आपणास आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेऊ शकता.

मुद्दा क्र. (३) बाबत कळविले की, आपण मागणी केलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही. त्यास्तव सदरची माहिती आपणास पुरविता येत नाही.

मुद्दा क्र. (४) बाबत कळविले की, मागणी केलेली माहिती ही मिळकत व्यवस्थापक विभाग, झो.पु.प्रा. यांचे कार्यालयाशी संबंधित असल्याने सदरची माहिती आपण संबंधित कार्यालयाकडे स्वतंत्र अर्ज करुन प्राप्त करुन घेऊ शकता.

४. जन माहिती अधिकारी यांनी असेही सादर केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोजित केलेल्या प्रथम अपील सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते व अपिलार्थींना अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती पुरविणे अपेक्षित आहे व अपिलार्थींना वाटपाची यादी पुरविलेली आहे असे नमुद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.०५.२०२५ रोजी प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

५. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास त्यांचे लेखी निवेदनासह सादर केलेले दि. ०९.१०.२०२४ रोजीच्या पत्रावरुन आयोगाच्या निदर्शनास येते की, जर माहिती अर्जातील मुद्दा क्र. ३ व ४ ची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याशी संबंधीत नव्हती तर त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे संबंधीत कार्यासनाकडे माहिती अर्ज हस्तांतरीत करुन अपिलार्थींना कळविणे अपेक्षित होते. त्याप्रमाणे सदर प्रकरणात कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. यापुढे जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

६. जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जातील मुद्दा क्र. ३ व ४ च्या अनुषंगाने संबंधीत कार्यालयाकडून माहिती प्राप्त करुन अपिलार्थींना आदेशप्राप्तीच्या ३० दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये नोंदणीकृत टपालाने निशुल्क कळवावे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

५-३-२०२६

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०५.०३.२०२६**